MHGA130001472024

विशेष (एनडिपीएस) खटला क्र.२०/२०२४
महा.शासन मार्फत पोलीस स्टेशन,
अहेरी वि– भैयाजी

निशानी ०४ वरील आदेश
(दि.०९/०५/२०२४)

१. अर्जदार/आरोपी भैयाजी महादेव कुळमेथे यांने कलम ४३९ फौजदारी प्रक्रिया संहिते प्रमाणे अहेरी पोलीस स्टेशन येथील अपराध क्रमांक ०५३/२०२४ मध्ये कलम ८(क),२०(अ)(ब)(ii) गुंगीकारक औषधी द्रव्य व मनोव्यापारावर परिणाम करणारे पदार्थ नियम १९८५ अन्वये नोंद असलेल्या गुन्हयामध्ये नियमीत जामीन मिळणेसाठी अर्ज दिला आहे. अर्जदार हा किष्टापुर येथील रहिवासी आहे. जप्त केलेले बिया व पाला हे गांजा ठरत नाही त्याकरीता गांजाचे झाड जप्त करणे गरजेचे असते. पुर्वीचा जामीन अर्ज तपास अपुर्ण आहे या कारणावरुन नामंजुर करण्यात आले. आत तपास पुर्ण होउन दोषारोप पत्र दाखल करण्यात आले. त्यामुळे परिस्थीतीत बदल झाल्याने अर्जदाराचा जामीन अर्ज चालण्यास पात्र आहे. करीता अर्जदाराला शर्ती व अटीच्या आधारे जामीन मंजुर करण्यात यावे.

२. सरकारी वकीलांनी अर्जाच्या पाठीमागे अर्जाला विरोध करतांना असे म्हणणे सादर केले आहे की, मिळालेल्या गूप्त माहितीवरुन १७.२.२०२४ छापा घालण्यात आला आणि त्यावेळेस आरोपी हा गांजाची शेती करतो असे तपासअंती मिळून आले. जप्ती केलेले गांजाची वनज ४५ किलो इतके असून सुकलेला गांजा १ किलो ५०० ग्रॅम आहे मिळालेली गांजाची मात्र व्यवसायीक आहे त्यामुळे आरोपीला जामीन मागता येत नाही. करीता अर्ज फेटाळण्यात यावे. अशी विनंती करण्यात आली.

३. गुन्हयाची हकीकत अशी की, दि २८.२.२०२४ रोजी मिळालेल्या गुप्त

माहिती वरुन किष्टापुर येथे आरोपीच्या शेतात शासकीय पंचासमक्ष यातील आरोपीचे शेताची व घराची गांजासदृष्य पदार्थाबाबत घरझडती घेतली असता आरोपीचे घरी गांजासदृष्य पदार्थ मिळून आला. तसेच आरोपीने त्याचे स्वतःच्या फायद्यासाठी बेकायदेशीररित्या त्याचे शेतामध्ये शासनाने प्रतीबंधीत केलेल्या गांजाची लागवड करुन त्याची जोपासना, संवर्धन व विक्री करीता बाळगुन मिळून आल्याने फिर्यादीचे लेखी फिर्यादवरुन सदरचा नोंद करुन तपासात घेतला.

४. अर्जदाराच्या वकीलांनी असा युक्तीवाद मांडला की, पुर्वीचा जामीन अर्ज तपास अपुर्ण आहे या कारणावरुन नामंजूर करण्यात आला. परंतू आता तपास पुर्ण होउन दोषारोप पत्र दाखल करण्यात आले आहे. त्यामुळे सदरचा अर्ज चालण्यास पात्र ठरतो. अर्जदाराचे वकीलांनी राजेश शर्मा विरुध्द राजस्थान सरकार, जामीन अर्ज क्रमांक २३७६/२०२४, आदेश पारीत दि.२७.०२.२०२४ या राजस्थान उच्च न्यायालयाच्या जयपुर खंडपीठाचा निकालाचा आधार घेवून असा युक्तिवाद मांडला की गांजाचे झाड म्हणजे गांजा नाही. तपासा दरम्याण जो पत्र व्यवहार करण्यात आला तो सुध्दा योग्य नाही कारण २७.२.२०२४ चे पत्र २८.२.२०२४ ला प्राप्त झाल्यानंतर सुध्दा परवानगी मात्र दि २७.२.२०२४ रोजी देण्यात आली आहे. त्यामूळे आरोपीला शर्ती व अटी लागून जामीन देण्यात यावी, अशी विनंती केली.

५. या उलट सरकारी वकील श्री भांडेकर यांनी असा युक्तीवाद मांडला की, जप्त केलेली गांजीची मात्र ही व्यवसायीक आहे. आरोपी हा त्याचे वडीलांनी शासनाच्या जागेत केलेले अतिक्रमण शेतात अवैद्यरीत्या गांजीची लागवड करतांना मिळुन आला आहे. त्यामुळे आरोपी हा गांजाची शेती करतो आणि गांजा विक्री करतो असे स्पष्टपणे दिसून येते. मोठया प्रमाणात गांजा मिळून आल्याने आरोपीचा जामीन अर्ज नामंजुर करण्यात यावा, अशी विनंती केली.

६. दिलेल्या तक्रारीवरुन असे दिसून येते की, आरोपीच्या घराचे झडती केली असता आरोपीचे घरी सुकलेला गांजा मिळून आला, त्याचे वजन १ किलो ८०० ग्राम इतके असून आरोपीच्या शेताची पाहणी केली असता त्यात हिरवा पाला असलेला, बोंड असलेले मूळासहीत एकूण १५ गांजाचे झाडे मिळून आले ज्याचे वजन ४५ किलो ५०० ग्रॅम इतके

आहे. यावरुन असे स्पष्टपणे दिसून येते की आरोपी हा गांजाची शेती करुन सुकलेला गांजा साठवून त्याची विक्री करतो.

७. वर उल्लेख केलेल्या राजेश या न्यायनिवाडयातील न्यायतत्व या प्रकरणास लागू होणार नाही, कारण त्या प्रकरणात जप्त करण्यात आलेला वस्तू गांजा नसून भांग होती, परंतु या प्रकरणात आरोपीकडून सुकलेला गांजा १ किलो ८०० ग्रॅम जप्त करण्यात आला आहे व त्या अनुषंगाने शेताची पाहणी केली असता शेतात जिवंत १५ गांजाची झाडे मिळून आले. मिळालेली मात्रा ही व्यवसायीक असल्याने आणि गांजाचा परिणाम पुर्ण समाजामध्ये होतो अशा परिस्थीतीत आरोपीला जामीन मंजुर करणे न्यायोचित होणार नाही. कारण तारखेमध्ये केलेला घोळ हा फार मोठा घोळ नसुन नजर चुकीने झालेला घोळ आहे असे म्हणता येईल. त्यामुळे आरोपीचा जामीन अर्ज नि. ४ नामंजुर करणे न्यायोचित होईल. करीता खालीलप्रमाणे अंतिम आदेश पारीत करीत आहे.

## <u>आदेश</u>

जामीन अर्ज निशानी ४ नामंजुर करण्यात येतो.

Digitally signed by RAVISHANKAR NAMDEORAO BAWANKAR
Date: 2024.05.10 17:53:09 +0530

अहेरी.
दि. ०९/०५/२०२४

(र. ना. बावनकर)
अतिरिक्त सत्र न्यायाधीश
अहेरी.